# फक्त सभासदांसाठी

जावक क्र. 07/2025–26

तुळजाभवानी अर्बन मल्टीस्टेट को–ऑप.क्रे सो.लि.माजलगाव जि.बीड सर्व सन्मानीय सभासदांना कळविण्यात येते कि,संस्थेची 14 वी वार्षिक सर्वसाधारण सभा संस्थेचे विद्यमान अध्यक्ष मा.श्री शेजुळ चंद्रकांत प्रकाशराव यांचे अध्यक्षतेखाली दि. 29/09/2025 वार सोमवार रोजी संस्थेचे " रयत भवन" ,जुना मोंढा , माजलगांव ता.माजलगाव जि.बीड या ठिकाणी सकाळी ठिक 11: 00 वाजता खालील विषयाचे कामकाज करण्यासाठी आयोजीत करण्यात आलेली आहे. तरी या सभेस सर्व सन्माननिय सभासदांनी वेळेवर उपस्थित राहावे हि नम्र विंनती.

विषय पत्रिका

1. दिनांक 22 सप्टेंबर 2024 रोजीच्या वार्षीक सर्वसाधारण सभेचा इतिवृत्तांत वाचुन कायम करणे.
2. सन 2024-25 आर्थिक वर्षाचा वार्षिक अहवाल , 31 मार्च 2025 अखेरचा ताळेबंद व नफा तोटा पत्रक वाचुन कायम करणे व त्यास मंजुरी घेणे.
3. सन 2024-25 अखेर झालेल्या नफ्याची मा.संचालक मंडळाने सुचविल्यानुसार विभागणी प्रस्तावास व भागांवरील लाभांशास मंजुरी घेणे.
4. सन 2025-26 सालच्या पुरवणी अंदाजपत्रकास व सन 2024-25 मधील अंदाजपत्रकापेक्षा जादा झालेल्या खर्चास मंजुरी घेणे.
5. मा. केंद्रीय निबंधक नवी दिल्ली यांनी जारी केलेल्या प्रुडेंशियल नॉर्म्स परिपत्रकाची नोंद घेणे.
6. सन 2025-26 सालाकरिता वैधानिक लेखापरिक्षकांची व अंतर्गत लेखापरिक्षकांची नियुक्ती करणे व त्यांचे मानधन ठरविणे बाबत निर्णय घेणे.
7. सन 2023-2024 चे वैधानिक लेखापरिक्षणातील दोषांची दुरूस्ती अहवालास मा.संचालक मंडळाने दिलेल्या मंजुरीस मान्यता घेणे.
8. सन 2024-25 चे वैधानिक लेखापरिक्षण अहवालाची नोंद घेउन स्वीकृत करणे.
9. सन 2023-24 आयकर लेखापरिक्षण आणि जि.एस.टी लेखापरिक्षण अहवालाची नोंद घेउन स्वीकृत करणे.
10. मा.संचालक मंडळ व त्यांचे नातेवाईक यांच्याकडुन येणे असलेल्या कर्जाची माहिती घेणे.
11. सन 2024-25 या आर्थिक वर्षात थकित असलेल्या कर्जदारांना सवलत देउन बंद करण्यात आलेले कर्ज खाते व पुनर्गठीत,पुनर्रचना,पुर्णलिखीत, निर्लेखीत करण्यात आलेल्या कर्ज खात्यास मंजुरी घेणे.
12. नविन कर्ज धोरण व ठेव धोरण यास मंजुरी घेणे.
13. थकबाकी कर्ज वसुलीसाठी OTS Policy एक रक्कमी कर्जपरतफेड योजनेस मंजुरी घेणे.
14. प्रुडेंशियल नॉर्म्सच्या अधिन राहुन संस्थेच्या नविन दोन शाखा चालु करण्यासाठीच्या प्रस्तावास मंजुरी घेणे.
15. सभासदांच्या मागनीनुसार मंजुर झालेल्या शाखांपैकी उर्वरीत पाच शाखेच्या कार्यक्षेत्रात व पत्यात बदल करण्यास मुंजरी घेणे.
16. सन 2024-25 आर्थिक वर्षातील कर्मचारी यांची वेतनवाढ, दिपावली बोनस , इन्सेटिव्ह ,कर्मचारी पाल्यांचा शैक्षणीक खर्च , कर्मचारी पालक पेंशन , आरोग्य व अपघाती विमा खर्चास मंजुरी घेणे.
17. कर्मचारी पद/पदोन्नंती , पगारी धोरन व सेवा नियमावलीस मंजुरी घेणे.
18. संस्थेच्या अंबाजोगाई शाखेच्या स्थलातंरास मंजुरी घेणे.
19. संस्थेच्या पाथरी व छ.शिवाजी चौक माजलगाव शाखेचे नुतनिकरण करण्यास झालेल्या खर्चास मंजुरी घेणे.
20. वार्षीक सर्वसाधारण सभेस अनुपस्थित सभासदांच्या रजेस मान्यता देणे.

21. मा.अध्यक्ष यांच्या परवानगीने ऐनवेळी येणा–या विषयावर चर्चा करूण मंजुरी घेणे.

दिनांक 04/09/2025
ठिकाण : माजलगाव

मा.संचालक मंडळाच्या आदेशावरून,
शेजुळ शहाजी अच्युतराव
मुख्यकार्यकारी अधिकारी
तुळजाभवानी अर्बन मल्टीस्टेट को–ऑप.के सो.ली.माजलगाव

टिप :

1) गणपुर्तीअभावी तहकुब झालेली वार्षीक सर्वसाधारण सभा त्याच दिवशी नमुद केलेल्या जागी एक तासानंतर घेण्यात येईल. या सभेस गणपुर्तीची व वेगळया सुचनेची आवश्यकता राहणार नाही.
2) काही कारणाने आपण सभेस उपस्थित राहु शकत नसल्यास तसा लेखी विनंती अर्ज मुख्यकार्यालय किंवा शाखेत द्यावा
3) जे सभासद सतत 3 वर्षातील किमान एका तरी वार्षीक सर्वसाधारन सभेस उपस्थित राहीले नसतील व सतत दोन आर्थिक वर्षात संस्थेमध्ये किमान रू.1000/– चा व्यवहार केलेला नसेल अशा सभासदास अक्रियाशील सभासद म्हणुण गणले जाईल.
4) ज्यासभासदांना वार्षिक सर्वसाधारण सभेत काही प्रश्न अथवा सुचना मांडावयाच्या असतील तर त्यांनी आपल्या लेखी सुचना व प्रश्न 15 दिवसाच्या आत मुख्यकार्यालयामध्ये संस्थेच्या कार्यालयीन वेळेत पाठवावीत.